VOL- X ISSUE- VII JULY 2023 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.367 ISSN 2349-638x

# 'तणकट' या कादंबरीतील जीवन जाणिवा : एक आकलन

**प्रा. लक्ष्मण व्यं. बिराजदार**
सहाय्यज प्राध्यापज
मराठी विभाग,
आदर्श महाविद्यालय, उमरगा

**प्रास्ताविक :**

राजन गवस यांनी 'तणकट' ही ज ादंबरी १९९८ साली लिहिली असून समाजातील बेरोजगारी, दलित समाजाचे वास्तव जीवन, भ्रष्टाचार, स्वार्थी राजकारण, मतलबी संघटना, स्वार्थी नेते यांच्यावर प्रकाश टाकण्याचे कार्य केले आहे. समकालीन काळात लेखकाला जो वास्तव अनुभव आला त्याचे प्रतिबिंब 'तणकट' या कादंबरीमध्ये लेखकाने मांडले आहे. १९८० नंतरच्या काळातील एक कसदार, स्पष्टपणे आपले लेखन करणारे लेखक म्हणून राजन गवस यांची ख्याती आहे. राजन गवस यांनी 'चौंडक' (१९८५), 'भंडारभोग' (१९८९), 'धिंजाजा' (१९९२), 'ज ळप' (१९९७), 'तणकट' (१९९८) या पाच कादंबऱ्यातून समाजातील विविधांगी प्रश्न, समस्या, शोषण, दु:ख, अन्याय, अत्याचार यावरती प्रकाश टाकण्याचे कार्य केले आहे. राजन गवस हे सामान्य माणसांचे केवळ दु:ख मांडणारे लेखक नसून त्या दु:खाची पाळेमुळे शोधणारे लेखक आहेत. म्हणूनच त्यांच्या कादंबऱ्याला सामाजिक भान प्राप्त झाले आहे.

## ➢ तणकट या कादंबरीतील जीवन जाणीवा :

"कादंबरीमध्ये जीवनाचे चित्रण मानवी पात्राच्या माध्यमातून केले जाते. म्हणून पात्र हे कादंबरीचे माध्यम आहे."[१] 'तणकट' या कादंबरीमध्ये राजन गवस यां-ी साकार केलेले अनुभवविश्व, जीवनदर्शनाचा घेतलेला वेध, आशयाची व्याप्ती, त्यातील सूचकता, जीवन सत्याचे प्रकटीकरण आणि अभिव्यक्त केलेल्या जाणिवा किती व्यापक आहेत याचा शोध खालीलप्रमाणे घेतला आहे.

**१. नवनैतिकवादातून साकारलेली वास्तविक जाणीव :**

"जेल्या दो-ा-तीन दशकात राजकारणातील दिशहिनता आणि मूल्यभ्रष्टता यांचा विदारक दस्तऐवज असे राजन गवस यांच्या 'तणकट' या कादंबरीचे यथार्थ वर्णन करता येईल."[२] राजन गवस यांच्या 'तणकट' या कादंबरीतील जाणिवा व्यापक आहेत. त्यांनी नवनवीन विषयावरील जीवनदर्शन घडविणाऱ्या कादंबऱ्या लिहून मराठी कादंबरीला समृध्द करण्याचे, समाजाचे परिपूर्ण व अनेकांगी दर्शन घडविण्याचे कार्य केले. म्हणून डॉ.गजाजन जाधव म्हणतात की, "१९८० नंतरच्या काळातील मानवी जीवन वास्तवाला नवनैतिकवादी भूमिकेतून सामोरे जाणाऱ्या वास्तववादी कादंबऱ्याचा पट मराठीमध्ये राजन गवस यांच्या कादंबऱ्यांनी निर्माण जे ला."[३] 'तणकट' या कादंबरीचा नायक कबीर असून तो संवेदनशील मनाचा, सामाजिक समतेवर श्रध्दा ठेवणारा आहे. बदलते वास्तव, परंपरा विरूध्द परिवर्तनवादी विचारांचा तो पुरस्कर्ता आहे. या कादंबरीत समूहमनाची जाणीव, कायद्याची हक्काची, सामाजिक बांधिलकी, सामाजिक दुभंगलेपणाची जाणीव व्यक्त झाली आहे. दलितांवर होणारा पूर्वीपासूनचा अन्याय, अत्याचार, दलितांचे समाजकारण, अर्थकारण, राजकारण चळवळी यामध्ये सर्वच ठिकाणी त्यांना अपशय कसे आले आहे ते विविध जाणिवांच्या माध्यमातून लेखकांनी व्यक्त केले आहे.

**२. आत्मशोध व दलित्त्वाची जाणीव :**

'तणकट' ही कादंबरी दलित समाजाची व्यथा मांडणारी कादंबरी आहे. एक गाव, त्या गावाचा परिसर, गावातील दलित व उच्चवर्णीयातील संघर्ष, संघर्षाची वेगवेगळी रूपे, गावातील लोकांच्या वेगवेगळ्या प्रवृत्ती, आत्मभान जागृत नवतरूण याचे वास्तव चित्रण प्रस्तुत

कादंबरीमध्ये मांडले आहे. बाळासाहेब शेडबाळे या मराठी पुढाऱ्याच्या कटकारस्थांनानी दलितांना दलित्त्वाची, अस्पृश्यतेची जाणीव कशी होते ते कादंबरीकाराने अत्यंत प्रभावीपणे चित्रित केले आहे. "दलित जाणीव म्हणजे दलित जीवनाच्या परिवर्तनाचा विचार होऊन आशावादी दृष्टिकोन ठेवून दलित जीवनातील दु:ख वेदनेने टिपण्याची प्रवृत्ती होय."[४] बाळासाहेब शेडबाळे आपल्या स्वार्थासाठी दलित व सवर्ण यांच्यात भांडणे लावतो. दूध डेअरीच्या भ्रष्टाचार प्रकरणात शेडबाळे महारवाड्याला जवळ करतो. त्यावेळी गावातील सभेत गौतम, पंढऱ्या, तान्या, तुका इ. व्यक्तिरेखांच्या माध्यमातून आपल्याही इतराप्रमाणे जगण्याचा अधिकार आहे ही जाणीव होते. यमुना ठकू कांबळे यांच्यावर सोमशेट्टी लिंगायत चोरीचा आळ घालतो. तेव्हा आनंदा कांबळे आपल्या भाषणात म्हणतो "आमच्या बाया म्हणजे काय ह्यास्नी काय माळावर पडल्यासारख्या वाटल्यात काय? माझं तर म्हणणं हाय की, आपण सगळ्यांनी मिळून त्या लिंगाड्याला उचलून हितं आणूया. हितल्या भर चौकात त्याची चामडी लोळवू या"[५] यावरून दलितपणाची जाणीव व्यक्त होते.

**३. आत्मस्वाभिमानाची जाणीव :**

'तणकट' या कादंबरीत आत्मभान, आत्मजागृती आणि आत्मस्वाभिमानाच्या जागृतीचे यथार्थ दर्शन लेजज ं-ी घडविले आहे. महाविद्यालयात असताना कबीर ऐवजी कुलकर्णी दरवाज्याला लाथ मारतो. परंतु प्रा.गजेंवार कबीरवर संशय घेवून त्याची जात काढतात. तेव्हा कबीर म्हणतो "सर तोंड आवरा्ऽऽ तुम्ही जे बोलताय ते मला चांगलं समजतंय. त्यातून तुमची संस्कृती आणि संस्कार दिसतात. जे बोलायचं ते विचार ज रू-ा बोला. दारावर लाथ मी मारलेली -ाही. या-ं मारलेली आहे आणि याचे आडनाव कुलकर्णी आहे."[६] यातून कबीरची आत्मस्वाभिमानाची भावना दिसून येते. प्रा.गजेंवार मागासवर्गीय मुलांकडे मारक्या म्हशीसारखा बघतो म्हणून त्याचे डोळे काढले पाहिजे. अशी जयप्पा कांबळे यांची भूमिका होती ती आत्मस्वाभिमानाची प्रतिती देते. बाळासाहेब शेडबाळे म्हणतो "आता काय काय सांगू? आगा राडंच्यांनी आम्हासारख्या बारक्या जातीच्या मानसास्नी सगळीकडंन गोत्यात आणलय. आम्हाला ते कडूच समजत्यात...ह्येच्याय बापजाद्यांनी रांडा ठेवल्या, आमची वसावळ वाढीवली तसा तुमच्यात आनी आमच्यात काय फरक."[७] यावरू-ा बाळासाहेब शेडबाळेचा आत्मसन्मान दिसून येतो. थोडक्यात पाटलाच्या घरावर जाणे, गावावरच दलितांनी बहिष्कार घालणे, जयंत्या-उत्सव साजरे करणे, जय भिम तरूण मंडळाची स्थापना करणे, पोलिसात गावकऱ्यांविरूध्द तक्रारी देऊन त्यांना जेरीस आणणे ही सर्व आत्मस्वाभिमानाची उदाहरणे देता येतील.

**४. सामाजिक बांधिलकीची जाणीव :**

'तणकट' या कादंबरीत सामाजिक बांधिलकीचा प्रत्यय येत असून दु:ख व शोषण हा राजन गवस यांच्या समाजचित्रणाचा आत्मा आहे. प्रत्येक कादंबरीत सामाजिकता कशी असते. याविषयी द.भि.कुलकर्जी म्हणतात. "प्रत्येक कादंबरी -मग रम्यादभूत असो, पौराणिक असो की, मनोविश्लेषणात्मक असो मुलत: सामाजिक कादंबरीच असते. एखादी वाङ्मयकृती कुठल्याच अर्थाने सामाजिक नसेल तरी ती कादंबरीच राहजार -ाही."[८] कबीरचे महाविद्यालयातील वागणे, गावातील संघर्षापासून दूर राहणे या गोष्टी सामाजिक वास्तवाचे चित्र प्रतिबिंबीत करतात. आपली व आपल्या समाजाची जगण्याची मिसाज ही गावावर अवलंबून असल्यामुळे गावकऱ्यांना आपणाला तोडता येणार नाही ही अशी थळबाची भूमिका सामाजिक बांधिलकीतून व्यक्त होते. जीवनावश्यक मूल्यांची जोपासना करणारा कबीर सामाजिक बांधिलकीसाठी महारवाड्यातील लोकांना काही गोष्टी समजावून सांगण्याचा प्रयत्न करतो. अशाप्रकारे माणसाच्या जीवनाला विकसित करण्याकरीता सामाजिक जाणिवेची अधिक गरज असते ही जाण राजन गवस यांनी बाळगलेली दिसते. सामाजिक बांधिलकीतून लेखकांनी, समाजातील विविध प्रश्नांची, समस्यांची अत्यंत बारकाईने चिकित्सा केलेली आहे.

**५. स्त्री जाणिवांचे यथार्थ दर्शन :**

राजन गवस यांचा स्त्री विषयक दृष्टिकोन व्यापक, सुधारणावादी असल्याचा दिसून येतो. प्रस्तुत कादंबरीतून स्त्रीच्या दु:खाचे यथार्थ चित्रण केले आहे.

कादंबरीचा नायक कबीरची आई गंगव्वा, तानू आजी, रामा म्हाराची पत्नी सुला, बाळासाहेब शेडबाळेची पत्नी ताराबाई आणि आई या स्त्री पात्रांच्या माध्यमातून लेखकांनी स्त्रियांच्या अंतर्मनाचे दु:ख अत्यंत समर्थपणे मांडले आहे. शेडबाळे यांचे सुलीसोबत संबंध असल्यामुळे शेडबाळे कधीही बेरात्री घरी येत असतो. तेव्हा तारा म्हणते, "उलटून काय करंल? मारलंस नव्हं एखदाचा जीव तरी घेऊ दे मोकळी व्हईन. आता सगळं गळ्याला आलंय न्हाई सोसत बाई."[९] असे म्हणून तारा रडते. राधा वहिनी ताराला म्हणते, "आगं असं रडून न्हाई जमत असल्या माकडास्नी त्यांच्यासारखं वागूनच वठणीवर आनाय लागतंय. न्हाई तर लई भ्या दाखवित्यात. उद्या तुला घरातनं भाईर काढल आनी त्या रांडेला इथं आणून ठेविल."[१०] अशा संवादाच्या माध्यमातून स्त्रियांचे स्थान, त्यांचे जीवन, त्यांचे दु:ख, त्यांच्या समस्या यथार्थपणे मांडल्या आहेत. अशोक बाबर 'तणकट' मधील स्त्री विषयक दृष्टिकोनाबाबत म्हणतात की, "शेडबाळेच्या खिशात पापाचा पैसा खेळू लागला तसा शेडबाळे आपल्या अत्यंत गरीब पत्नीचे शोषण करतो. तशी दलित स्त्री सुली हिचेही कशा पध्दतीने शोषण करतो. याचे मर्मभेदी चित्रण गवस यांनी केले आहे. सुलीसुध्दा शोषणाची बळी आहे. शेडबाळेचे सुलीशी राजरोस संबंध असतात. असे जरी दाखविले असले तरी यांचे खास वैशिष्ट्ये म्हणून सांगता येईल की, याच चित्रणात त्यांनी लैंगिक चित्रण करण्याचा स्पर्शसुध्दा होऊ दिला नाही."[११] अशाप्रकारे खेड्यातील स्त्रियांच्या जगण्याचा, त्यांच्या शोषणाचा, दु:खाचा, स्त्री जन्म लाभल्यामुळे सगळी घुसमट सोसण्याचा लेखकांनी घेतलेला शोध स्त्री विषयक सुक्ष्म अवलोकनाची प्रतिती देतो.

### ६. 'तणकट' मधील सहानुभूतीची जाणीव :

प्रस्तुत कादंबरीत लेखकाने अक्काबा राणे व कबीर या पात्रांच्या माध्यमातून सहानुभूतीची जाणीव व्यक्त केली आहे. सर्व गावगाड्याने एकत्र नांदले पाहिजे, शेडबाळेच्या फसव्या भूलथापांना बळी न पडता सवर्णाविरूध्द संघर्ष करू नये अशी सहानुभूतीची भावना अक्काबा राणे यांची असते. कबीर कांबळे, सदबा, गंगव्वा, थळू आजा, अक्काबा राणे, मोहन बल्लाळ, आमदार महिपतराव सरनोबत यांच्या माध्यमातून सहानुभूतीची प्रतिती येते. अक्काबा कबीर कॉलेजला जाईल, त्याचे जीवन शिक्षणाने सुधारेल म्हणून सायकल घेवून देतो. ते कबीरला म्हणतात, "मागच्या म्हयन्यातच द्यायची व्हती तुझ्याकडं लावून खरं कशात इसारलं आता घिवून जा. हिला काय दुरूस्ती-बिरूस्ती बघ. लागणार नाहीच कारण पोरगा सुट्टीत वापरतोय. लागलीच तर करून घे पैसे घेऊन सांग"[१२] यावरून कबीरबद्दल अक्काबा राणे यांची असलेली सहानुभूतीची जाणीव व्यक्त होते.

### ७. सामाजिक दुभंगलेपणाची जाणीव :

प्रत्येक लेखक जीवन जगत असताना आलेला अनुभव लेखन रूपाने आत्माविष्कार करीत असतो, लिहित असतो. तो ज्या समाजात जन्मला, वाढला, बहरला त्या समाजाचे जगणे, चाली-रीती, त्या समाजातील भेडसावणारे प्रश्न तो कादंबरीच्या किंवा साहित्याच्या माध्यमातून मांडत असतो. समाजात अनेक जाती, धर्माचे, पंथाचे लोक राहत असल्यामुळे त्यांच्यात एकसंघत्वाची भावना कधी-कधी ढळू लागते. ही एकसंघत्वाची भावना भडकाविण्याचे कार्य अनेक स्वार्थी नेते, वाङ्मयीन व सांस्कृतिक चळवळीत कार्य करणारे स्वार्थी कार्यकर्ते करतात त्यामुळे समाज कसा दुभंला जातो याचे यथार्थ चित्रण बाळासाहेब शेडबाळे या पात्राच्या माध्यमातून लेखकाने चित्रित केले आहे. कबीर कांबळे व अक्काबा राणे यांनी सामाजिक एकसंघत्वाची भावना वाढीस लावण्याची जाणीव ठेवून कार्य केले. अशाप्रकारे १९८० नंतर सामाजिक दुभंगलेपणाची जाणीव कशा पध्दतीने बळावत होती याचे यथार्थ दर्शन राजन गवस यांनी 'तणकट' या कादंबरीत घडविले आहे.

### ८. 'तणकट' मधील भूमिनिष्ठ जाणीवेचे यथार्थ चित्रण :

राजन गवस यांनी 'तणकट' या कादंबरीत समाजातील नैतिकता, लोकसंस्कृती, देशीसंस्कृतीचे भान यांच्या माध्यमातून भूमिनिष्ठ जाणिवांचे यथार्थ दर्शन घडविले आहे. उदा. मोहन बल्लाळ म्हणतो, "तुला माहितीय, बाबासाहेबांनी बुध्दाची ही दु:ख ही कल्पना शोषण म्हणून स्वीकारलेली होती. त्यांनी दु:ख म्हणजे

शोषण हा विचार स्वीकारला म्हणून जीवनाच्या पलिकडे बघू शकले, पण त्यांना समजून घेणेही पुढे नाही घडू शज्ले. मग तुज कशाला हे रडणं, ओरडणं, बधिर होणं, भटकणं आणि आपल्याला आता काहीच उरलं -नाही झुरत बसणं. मला हे सारंच निरर्थक आणि भंप्पक वाटतं म्हणून या भंप्पकपणातून बाहेर पड आपला जन्म भंप्पकपणाच्या कोषात जगण्यासाठी जागा नाही"[१३] तसेच बाळासाहेब शेडबाळेमुळे महारवाड्याचे कसे होईल याबद्दल कबीरला बल्लाळ म्हणतो, "आणि मुद्दा उरतो तो तुझा महारवाडा वाचविण्याचा आणि वाचण्याचा तो वाचेल त्याच्या स्वत:च्या हिमतीवर तगेल. तगणे हा तर आपल्या कृषी संस्कृतीचा अद्वितीय वारसा आहे आणि महारवाडा मातीला जवळचा आहे. वास्तविक तुमच्या तमाम नेत्यांनी हेच पहिल्यांदा ध्यानात घ्यायला हवं होतं की, हा देश खेड्यांचा आहे आणि महारवाड्याची सगळी मुळं खेड्यातल्या जमिनीत आहेत. तेच विसरले सगळे आणि बोलत राहिले. मध्यमवर्गीय ब्राह्मणी क्रांतीचे जाहीरनामे, मग घोषणा, मोर्चे, उपोषणे आणि चळवळ सगळं शहरातल्या रस्त्यावर आणि वर्तमानपत्रातल्या कागदावर वास्तविक इथेपण शहरात पडले. मग त्याचे मध्यमवर्गीय होणे अटळ आहे."[१४] ही भूमिनिष्ठ जाणीव अधिक तीव्रतेने व्यक्त होते. खेड्यातल्या देशात एक संस्कृती आहे आणि या खेड्यात म्हारवाड्याची बीजे कायमची रोवलेली आहेत. म्हणून सर्वांनी एकसंघ राहिजे, सामाजिक परिवर्तन स्वीकारले पाहिजे अशी भावना भूमिनिष्ठ जाणीवेतून व्यक्त झाली आहे.

अशाप्रकारे राजन गवस यांची 'तणकट' ही कादंबरी साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त असून या कादंबरीत सामाजिक बांधिलकी, स्त्री जाणीव, सहानुभूती, भूमिनिष्ठ, एकसंघत्वाची जाणीव व्यक्त झाली आहे.

**संदर्भग्रंथ सूची**

१. देशपांडे कुसुमावती :मराठी कादंबरीचे पहिले शतक, मुंबई मराठी साहित्य संघ,-१९७५, पृ.ज्र.४७
२. गवस राजन : तणकट, प्रकाशन-साकेत प्रकाशन, औरंगाबाद, द्.आ.-२००२,मलपृष्टावरून.
३. डॉ.जाधव गजानन : प्रतिष्ठाण,मा/एप्रिल-२०१०, पृ.ज्र.५२
४.डॉ.चव्हाण अंकुशकुमार :भटक्या-विमुक्तांची आत्मकथने : स्वरूप आणि संकल्पना,संस्कार प्रकाशन, लातूर, प्रथमावृत्ती-२००८, पृ.ज्र.-२४
५. गवस राजन :तणकट, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती-१९९८,पृ.ज्र.५१
६. तत्रैव : पृ.ज्र.१५
७. तत्रैव : पृ.ज्र.९४
८. डॉ.कुलकर्णी द.भी.: ज्ादंबरी : स्वरूप व समीज्ञा, पद्मजंधा प्रज्ाश-न, पुजे, प्रथमावृत्ती-२००३, पृ.ज्र.१७
९. गवस राजन : तणकट, पृ.क्र.१४८
१०. तत्रैव : पृ.ज्र.१४८
११.बाबर अशोक : देशीवाद, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती-२००५ पृ.ज्र.२३१
१२. गवस राजन: तणकट, पृ.क्र.१५९
१३. तत्रैव : पृ.ज्र.२३८
१४. तत्रैव : पृ.ज्र.२३